*(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

*NAVJYOT / Vol. X / Issue – I* *ISSN 2277-8063*

# १९ व्या शतकातील महाराष्ट्रातील शेतीव्यवस्था

**प्रा. अंगद नरसगोंडा पाटील,** राज्यशास्त्र विभाग कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, इस्लामपूर जि. सांगली.

.......................................................................................................................................

**प्रस्तावना :—**

१९ व्या शतकात भारतात शेती पारंपारिक पध्दतीने केली जात होती. या काळातील शेती कसण्याची साधने जुनाट व पारंपारिक पध्दतीची होती. त्यामुळे मिळणारे उत्पन्न अत्यल्प होते. ब्रिटिशांनी भारतात आपली सत्ता स्थापन केल्यानंतर ब्रिटनमधील कारखान्यांना लागणारा कच्चा माल पुरविण्यासाठी कापूस, ताग, चहा, नीळ, मसाले यांचे उत्पादन करण्यासाठी सक्ती सुरू केली, ब्रिटिशांनी नफ्यासाठी भारतीय शेतीचे व्यापारीकरण केल्यामुळे ग्रामीण भारताची स्वयंपूर्णता नष्ट झाली. ब्रिटिशांनी सुरू केलेल्या नव्या महसूल पध्दतीमुळे भारतातून ब्रिटनकडे मोठ्या प्रमाणावर संपत्तीचे हस्तांतरण होऊ लागले. भारतातील शेतकरी हा अडाणी, धर्मश्रध्द, पारंपारिक विचारांचा, सावकारी व संरजमाशाहीच्या जाळ्यात गुरफटलेला असल्यामुळे तसेच सरकारकडूनही कोणतीही मदत न मिळाल्यामुळे तो दरिद्रीच राहिला. भारतातील अन्य राज्यांप्रमाणेच महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचीही सावकारी, सरंजामशाही सरकारी धोरण यामुळे मोठ्या प्रमाणात नागवणूक होत होती. प्रस्तुत शोधनिबंधात १९ व्या शतकातील महाराष्ट्रातील शेतीव्यवस्थेचा थोडक्यात आढावा घेतला आहे.

➢ **विषय विवेचन :—**

इ.स. १९१८ साली महाराष्ट्रातील पेशवाईचा अस्त झाल्यानंतर काही मोठ्या संस्थानांचा अपवाद वगळता महाराष्ट्र आणि गुजरातमधील पेशव्यांचे राज्य ब्रिटिशांच्या ताब्यात गेले. पेशवाईची राज्यव्यवस्था ही सरंजामशाही पध्दतीची होती. पेशवाईच्या उतरत्या काळात सरंजामदारांचा जाच मोठ्या प्रमाणात वाढलेला होता. ठग, पेंढारी आणि छोट्यामोठ्या लुटारूंनी रयतेची मोठी लूट केली होती. पेशवाईत धर्माचे व कर्मकांडाचे प्राबल्य वाढूते राज्यसत्तेचा वापर करून त्यांना अनेक नव्या धार्मिक परंपरा सुरू केल्या. पेशवाईत समाजावर ब्राम्हणी धर्माचा प्रभाव वाढला तसा त्यांचा स्त्री—शूद्रांवरील अन्यायही वाढला शेतकऱ्यांकडून करूपाने गोळा केलेला पैसा सरकार ब्राह्यणांमध्ये वाटत होते. त्यामुळे श्रम न करता खाणाऱ्यांचे दुराचार व अनाचार वाढले.

१९ व्या शतकातही महाराष्ट्रात मराठेशाहीतील सरंजामी शेतीव्यवस्था कमी अधिक बदलांसह कायम होती. त्या व्यवस्थेची काही वैशिष्टये होती सुरू होती. मलिकेवर, शिवाजी महाराज, माधवराव पेशवे यांनी साराबंदी, भूमापन या काही बदल घडवून आणले तरी ते अगदीच मूलभूत नव्हते. त्यामुळे जुनीच सरंजामशाही शेतीव्यवस्था कमी अधिक बदालासह कायम होती. त्या व्यवस्थेची काही वैशिष्टये होती.

१) मराठेशाही राज्यवस्थेत शेती वैयक्तिक मालकीची नसून सामुहिक मालकीची होती. सरकारने काही अटींवर ती शेतकऱ्यांना कसण्यासाठी दिली होती.

२) गावात मिरासी व उपरी असे शेतकऱ्यांचे दोन प्रकार होते. मिरासी हे गावच्या वसाहतीपासून शेतीचे मालक होते, तर उपरी हे शेतकऱ्यांना कौलनामा देऊन शेत कसण्यासाठी घेत होते.

३) राजा व शेतकरी यांच्या संबंधात देशमुख, मामलेदार आणि पाटील हे मध्यस्थी करणारे आधिकारी होते. गावचा शेतसारा निश्चित करताना मामलेदार आणि पाटील विचारविनिमय करीत होते.

४) शेतसाऱ्याची आकारणी व्यक्तिशः न होता संपूर्ण गावाचा शेतसारा ठरविला जात होता. तो गोळा करण्याचा व सरकारकडे जमा करण्याचा अधिकार पाटलाकडे होता.

५) मराठेशाहीच्या काळात सावकाराचा कर्जाच्या मोबदल्यात शेत लिहून देण्याची पध्दत नव्हती. त्याशिवाय दामदुपटीचा कायदाही प्रचलित नव्हता मुद्दलाइतके व्याज झाले म्हणजे त्यापेक्षा जास्त पैसा वसूल करण्याचा अधिकार सावकारास नव्हता. कर्जाच्या वसुलीसाठी सावकारास राज्यसंस्था मदत करीत नव्हती. आपल्या कर्जाच्या वसुलीसाठी सावकार कर्जदार शेतकऱ्यांच्या घरासमोर धरणे धरत असत.

पेशवाईतील दुसऱ्या बाजीरावाच्या काळात शेतकऱ्यांवरील अन्याय वाढला. कारण त्याने शेतसाऱ्याव्यतिरिक्त इतर अनेक नवे कर शेतकऱ्यांवर लादले. त्याची वसुली करण्यासाठी पाटील व मामलेदार यांच्याऐवजी स्वतंत्र अधिकारी नेमले. या अधिकाऱ्यांनी करांच्या वसुलीसाठी शेतकऱ्यांवर मोठ्या प्रमाणात अन्याय केले. थोडक्यात, जातिव्यवस्था, पंचायतव्यवस्था बलुतेदारी आणि गावचे अधिकारी या पायांवर संरजामी व्यवस्था उभी होती. दुसऱ्या बाजीराव पेशव्याच्या काळात त्यात अनेक भ्रष्ट गोष्टींचा समावेश होऊन शेतकऱ्यांवर अनन्वित अत्याचार झाले.ब्रिटिशांचे राज्य भारतात स्थापन झाल्यानंतर त्यांनी महाराष्ट्रात हळूहळू बदल घडवून आणावयास सुरूवात केली. शेतसारा हे त्या काळातील उत्पन्नाचे प्रमुख स्त्रोत होते. त्यामुळे उत्पन्नात वाढ करण्यासाठी शेतीव्यवस्थेत सुधारणा करणे गरजेचे होते. ब्रिटिश सरकारने ठग व पेंढाऱ्यांचा बंदोबस्त केल्यानंतर हे बदल करावयास सुरूवात केली त्याबरोबरच इंग्रजी शिक्षण देण्यासही सुरूवात केली. त्यासाठी काही शहरात शाळा सुरू केल्या. मात्र हे शिक्षण काही मोजक्या ठिकाणी व मोजक्या लोकांनाच देण्यात येणार होते. खालच्या जातीत व शेतकऱ्यांत शिक्षणाचा प्रसार व्हावा असे ब्रिटिशांचे धोरण नव्हते.

शेती क्षेत्रात ब्रिटिशांनी काही नवे बदल घडवून आणावयास सुरूवात केली. उत्तर भारतात बंगाल प्रांतात ब्रिटिशांनी कायमधारा पध्दत लागू करून जमीनदारांचा एक नवा वर्ग निर्माण केला होता. मात्र दक्षिण भारतात त्यांनी रयतवारी पध्दत लागू केली. हीच रयतवारी पध्दत महाराष्ट्रातही लागू केली प्रिंगल या ब्रिटिश अधिकाऱ्याच्या मते, महाराष्ट्रातील शेतीव्यवस्थेच्या सामुहिक स्वरूपामुळे ग्रामीण समाजाची प्रगती होत नाही. कारण स्वतः कष्ट करणाऱ्या शेतकऱ्यांस त्याचा लाभ मिळत नाही. म्हणूनच महाराष्ट्रात वैयक्तिक मालकीवर

आधारलेली रयतवादी पध्दत सुरू केली पाहिजे. पाटील, पंचायत, देशमुख, मामलेदार यांची शेतकऱ्यांच्या व्यवहारातील मध्यस्थी बंद केली पाहिजे. या विचारांचा पाठपुरावा करून ब्रिटिश अधिकाऱ्यांनी महाराष्ट्रात रयतवारी पध्दत सुरू केली. करून या पध्दतीची काही प्रमुख वैशिष्टये होती.

१) या पध्दतीमुळे शेतीवरील सामुहिक मालकी नष्ट होऊन त्याऐवजी वैयक्तिक मालकी प्रस्थापित झाली. त्यामुळे शेतकऱ्याला त्याची जमीन विकण्याचा अधिकार प्राप्त झाला. जमिनीचे वर्गीकरण करून जमिनीला भूमापन क्रमांक आणि मालकीचे कागदपत्र देण्यात आले.

२) जमिनीची वर्गवारी करताना तालुक्याचे पर्जन्यमान, हवामान, मशागतीचे स्वरूप यांचाही विचार केला गेला. त्यानंतर प्रत्येक शेतकरी, त्याच्याकडे असणारी जमीन, त्याची प्रतवारी पाहून शेतसारा ठरविण्यात आला. हा शेतसारा तीस वर्षातून एकदाच निश्चित करण्यात येत होता.

३) शेतकरी त्याचा शेतसारा सरकारकडे वस्तूंच्या किंवा धान्याच्या स्वरूपात जमा न करता तो पैशाच्या स्वरूपात जमा करू लागला.

४) शेतीची मालकी कसणाऱ्याकडे राहणार असल्यामुळे त्याच्या कष्टाचा योग्य मोबदला त्याला मिळू लागला. त्याबरोबरच शेतकरी व सरकार यांच्यामधील मध्यस्थ्याची व्यवस्था नष्ट झाल्यामुळे त्यांच्यात प्रत्यक्ष संबंध येऊ लागले. शेतीवर कसणाऱ्याची मालकी निर्माण झाल्यामुळे शेतीतील उत्पन्न वाढले आणि सरकारलाही अधिक महसूल मिळू लागला.

रयतवारी पध्दतीमुळे ग्रामीण भागातील सामुहिक शेतीची व जीवनाची पध्दत मोडकळीस आली. ब्रिटिशांनी प्रत्येक गावाचा नकाशा तयार करून जमिनीच्या तुकड्यांची मोजणी करून त्यांना क्रमांक दिले. शेतसारा प्रत्येक शेतकऱ्याच्या शेतीच्या आकारावर व मगदुरावर लादला. त्यामुळे महसुलाचे सामुहिक जबाबदारीचे तत्त्व संपुष्टात आले. भांडवलशाही व्यवस्थेतील खाजगी मालमत्तेचे तत्त्व शेती व्यवसायात लागू केल्यामुळे शेती व्यवस्थेत अमूलाग्र बदल झाले. केवळ शेतसारा वाढवून नफा मिळविणे हा ब्रिटिशांचा हेतू असल्यामुळे रयतवारी पध्दतीचा महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना उपयोग न होता त्यांची वाताहत झाली.

ब्रिटिशांनी शेतीबरोबरच इतर क्षेत्रातही मूलभूत बदल घडवून आणले. नवी न्यायालये स्थापन केली. खरेदी—विक्रीच्या नव्या नियमांमुळे शेतकरी आपली जमीन विकू शकत होता. त्यामुळे सावकारशाहीचे मोठे स्तोम माजले. ब्रिटिशांनी लावलेल्या चढ्या शेतसाऱ्याइतकी रक्कम शेतकरी शेतीतून मिळवू शकत नव्हता. कालांतराने भारतीय शेती जागतिक बाजारपेठेस जोडली जात होती. बाजारपेठेत धान्याची उलाढाल करणारे कमिशन एजंट्स आणि आडत दुकानदारांचा एक नवा वर्ग निर्माण झाला. जागतिक बाजारपेठेतील तेजीमंदीचा प्रभाव भारतीय बाजारपेठेवर पडू लागला. त्यामुळे भारतीय पीक पध्दतीत मोठे बदल झाले. १९७० नंतर शेतमालाचे भाव गडगडले. १८७४—७२ साली ज्वारीचा भाव एक रूपयास २२ शेर होता, तो १८७४—७५ साली एक रूपयास ४५ शेर झाला. त्यामुळे शेतकऱ्यांच्या रोकड उत्पन्नात मोठी घट झाली.

वाढीव शेतसारा आकारणीबरोबरच सावकारशाहीचे नवे संकट ब्रिटिशांनी भारतात उभे केले. ब्रिटिशपूर्व काळात सावकारांचे हात दामदुप्पट पध्दतीमुळे व जमिनीच्या विक्रीवरी बंदीमुळे त्यांचे हात बांधलेले होते. पण ब्रिटिशांनी केलेल्या जमिनीच्या खरेदी—विक्रीच्या बदलांमुळे सावकरांनी चक्रवाढ दराने व्याज आकारणीस सुरूवात केली. त्याच वेळी शेतमालाचे भाव गडगल्यामुळे घेतलेले कर्ज परत करणे शेतकऱ्यांना अशक्य बनले. कर्जाच्या वसुलीसाठी सावकारांनी सिव्हील कोर्टात शेतकऱ्यांवर खटले दाखल केले. केवळ एका पुणे जिल्ह्यात इ.स. १८६८ पासून १८७३ पर्यंतच्या सहा वर्षात अशा प्रकारच्या खटल्यांची संख्या सुमारे १२,००० वरून २८,००० पर्यंत वाढली. यातून शेतकऱ्यांवरील आर्थिक भार आणखी वाढला.

ब्रिटिश राजवटीतील कायद्यामुळे व न्यायाल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले व सावकारांचे हात बळकट झाले. त्यामुळे हजारो एकर जमीन सावकारांकडे गेली. गावातील सावकारात ब्राम्हण, गुजर व मारवाडी या जातीचे लोक होते. त्यांच्याकडे अनेक शेतकरी कूळ म्हणून काम करू लागले. स्वत:च्या शेतात ते शेतमजूर म्हणून काम करू लागले. कायद्याची प्रक्रिया शेतकऱ्यांना कळत नसल्यामुळे त्यांचा पैसा व शेत यांचे समर्पण होत होते. त्यामुळे चाळीस चाळीस एकरांचे मालक असणारे शेतकरी सावकारशाहीच्या जाळ्यात अडकले. केवळ अडीच—तीनशे रूपयांचे कर्ज परत न करू शकल्यामुळे त्यांना आपली शेती गमवावी लागली.साम्राज्यशाहीने भारतातील कच्च्या मालाची निर्यात करून भारतात आपल्या कारखान्यातील पक्का माल विकावयास सुरूवात केली. त्यातून देशी उद्योग व हस्तोद्योग नष्ट झाले. ब्रिटिशांनी कालवे बांधणीवर फारसा खर्च केला नाही. त्यामुळे शेती उत्पादन फारसे वाढले नाही. पण शेतीवर अवलंबून असणाऱ्यांची संख्या मात्र वाढली. ब्रिटिशांनी शेतीकडे केवळ उत्पन्नाचे एक साधन म्हणून पाहिल्यामुळे मोठमोठे दुष्काळ पडले. त्यात लाखो लोक मृत्युमुखी पडले. १८७७—७८ च्या मुंबई प्रांतात पडलेल्या दुष्काळात पाच—सहा लाख लोक मरण पावले. याला दुष्काळाबरोबरच ब्रिटिशांचे अन्नधान्य निर्यातीचे धोरणही कारणीभूत होते.

ब्रिटिशांच्या धोरणांमुळे शेतकरी व आदिवासींनी त्यांच्याविरूध्द अनेक सशस्त्र उठाव केले. ब्रिटिशांनी फॉरेस्ट (वन) खाते निर्माण करून आदिवासींच्या जमिनीवर ताबा मिळविला. त्यामुळे खानदेश व इतर भागातील आदिवासींनी बंड केले. १८३२ साली ओल्या दुष्काळाने हवालदिल झालेल्या पुण्यातील शेतकऱ्यांनी दंगे केले. १८५२ साली खानदेशात सर्व्हे सेटलमेंटच्या विरोधात शेतकऱ्यांनी उठाव केले. खानदेशात १८५० पर्यंत भिल्लांचे बंड सुरू होते. उत्तर कोकणात १९३९—४६ या काळात कोळ्यांनी सरकारविरोधात बंड पुकारले इस्लामपूरमध्येही नरसिंगराव यांनी सावकारांचे खजिने लुटले व जमीन शेतकऱ्यांत वाटली पुणे जिल्हात उमाजी नाईक व त्यांच्या मुलांना शेतकऱ्यांचा पाठिंबा होता. पण हे सारे बंड ब्रिटिशांनी अत्यंत निष्ठुरपणे चिरडून

टाकले. हे सारे बंड शेतकऱ्यांनी ब्रिटिशांच्या रयतवारी सारा आकारणी विरूध्द केले होते. १८७३—७४ साली दुष्काळामुळे व सावकारीमुळे त्रासलेल्या शेतकऱ्यांनी पुणे व नगर जिल्ह्यात उठाव केले. सावकारांची घरे लुटली, त्यांची कागदपत्रे जाळली.

या काळात महाराष्ट्रात हळूहळू काही नव्या सुधारणा होत होत्या. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांमध्ये वेगवेगळे थर होते. त्याचप्रमाणे नवा सुशिक्षित मध्यमवर्गही आकाराला येत होता. ब्राह्मणवर्गाने इंग्रजी शिक्षणाचा लाभ घेऊन सरकारमधील अनेक महत्वाची पदे प्राप्त केली. त्यामुळे संपूर्ण समाजावर त्यांचे वर्चस्व प्रस्थापित झाले. इतर जातीमध्येही अगदी लहान प्रमाणावर मध्यमवर्ग निर्माण होत होता. याच वर्गाने ब्राह्मणी वर्चस्वावर हल्ला करावयास सुरूवात केली. डॉ. रविंद्रकुमार यांच्या मते, त्या काळात महाराष्ट्रातील शेतकरी वर्ग प्रामुख्याने तीन भागात विभागलेला होता. त्यातील पहिल्या थरात १० टक्के शेतकरी सुखवस्तू होते आणि त्यांच्याजवळ चांगल्या मगदुरांच्या जमिनी होत्या. दुसऱ्या थरात सुमारे ४० टक्के शेतकऱ्यांचा समावेश होता. त्यांच्याजवळ मध्यम दर्जाची २० ते ७० एकरापर्यंतची जमीन होती. हे कोरडवाहू शेतकरी होते. तसेच ते कर्जबाजारीही होते. तिसऱ्या थरातील ५० टक्के शेतकरी १० ते १५ एकर जमीन असणारे छोटे शेतकरी होते. त्यांची स्थिती फारच दयनीय होती. त्यांना कोणीही कर्ज देत नव्हते. त्याच्याजवळ शेतीसाठी लागणारे बैल व बारदाणही नसे त्यामुळे पर्यायाने त्यांना शेतमजूर बनावे लागत होते. दुष्काळात सुरू असलेल्या कामावर खडी फोडण्यासाठी त्यांना जावे लागत होते.

या काळात भारतात नव्या राजकारणाचा व समाजकारणाचा उदय होत होता. या काळातील राजकीय व सामाजिक चळवळीत काम करणाऱ्या नेत्यांनी शेतकऱ्यांचे प्रश्न हाती घेतले महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या प्रश्नावर 'सार्वजनिक सभा' व 'सत्यशोधक समाज' यांनी वेगवेगळे विचार मांडले. सार्वजनिक सभेने नव्या जमाबंदीस विरोध केला व काही भागात शेतकरी चळवळींना सुरूवात केली. त्या रानडे व जी.व्ही. जोशी यांचे शेतीविषयक विचार भांडवली अर्थशास्त्रावर आधारलेले होते. त्यांना भारतात भांडवली शेतीचा विकास अभिप्रेत होता. डोईजड शेतसारा, शेती कसण्याच्या मागास पध्दती, शेती सुधारणेची प्रेरणा नसणे आणि शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा यामुळे भारतीय शेती अविकसित राहिली, असे त्यांचे मत होते. शेतीचा विकास व्हावयाचा असेल तर भांडवली पध्दतीने व यंत्राच्या सहाय्याने शेती करणारा शेतकऱ्यांचा नवा वर्ग निर्माण झाला पाहिजे. तसेच शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करण्यासाठी सहकारी व शेती बॅंका स्थापन कराव्यात असे न्या. रानडेंचे मत होते.याऊलट दुसरा दृष्टिकोन म. जोतीराव फुले यांचा होता. फुलेंनी आपल्या ग्रंथातून ब्राम्हणी वर्चस्वाविरूध्द बंड पुकारले. त्यांच्या मते, ब्राह्मणांनी शेतकऱ्यांवर लादलेली गुलामगिरी सर्वांगीण आहे. न्या. रानडे व जोशींचा मार्ग त्यांना अमान्य होता. त्यांना सर्व कष्ट करणाऱ्या शेतकऱ्यांचे लोकसत्तात्मक राज्य स्थापन करावयाचे होते. त्यासाठी शेतकरी शिकला पाहिजे, त्याच्या हलाखीची कारणमीमांसा त्याला करता आली पाहिजे, त्यासाठी शेतकऱ्यांची सर्वांगीण मुक्ती झाली पाहिजे, धर्म, संस्कृती व जात इत्यादी बाबतीत त्यांचे जे शोषण चालू आहे त्यातून त्यांना मुक्तता मिळावी असे त्यांचे मत होते. त्यासाठी त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रबोधनाचे काम हाती घेतले.

**सारांश :—**

मराठेशाहीच्या काळापासूनच महाराष्ट्रात संरजामशाही पध्दतीने शेती केली जात होती. १९ व्या शतकातही शेती कसण्याची साधने ही जूनाट व पारंपारिक होती. पेशवाईच्या काळात कर्मकांड व धर्माचे महत्व वाढू लागल्यावर अनेक नव्या प्रथा सुरू करण्यात आल्या, दुसऱ्या बाजीराव पेशव्याच्या काळात शेतकऱ्यांवरील अन्याय व अत्याचारात वाढ झाली. कारण त्याने शेतसाऱ्यांव्यतिरिक्त अनेक नवे कर लादून सक्तीने त्यांची वसूली केली. १८१८ साली ब्रिटिशांचे राज्य स्थापन झाल्यांनतर त्यांनी शेती व्यवस्थेत सुधारणा घडवून आणण्यासाठी रयतवारी पध्दत सुरू केली. या पध्दतीनुसार शेतीवरील सामुहिक मालकी नष्ट होऊन वैयक्तिक मालकी निर्माण झाली. त्याला जमीन देऊन जमिनीची वर्गवारी करून त्यांना भूमापन क्रमांक देण्यात आले. शेतसाऱ्यात मोठ्या प्रमाणात वाढ करण्यात आली. परिणामी शेतीचे व्यापारीकरण होऊन पीक पध्दती बदलली. नफा मिळविणे हा ब्रिटिश राजवटीचा हेतू असल्यामुळे शेती सुधारणांचा शेतकऱ्यांना त्याचा फायदा झाला नाही.

ब्रिटिशांनी जमिनीची खरेदी—विक्री व न्यायालय यासंदर्भात केलेल्या नव्या सुधारणांमुळे सावकार चक्रवाढ पध्दतीने शेतकऱ्यांना कर्ज देऊ लागले. त्यांच्या वसुलीसाठी न्यायालयात खटले दाखल करू लागले. त्याच्या परिणामी शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा वाढला व सावकारांकडे त्यांच्या जमिनीचे हस्तांतरण मोठ्या प्रमाणावर होऊ लागले. १९ व्या शकतकाच्या उत्तरार्धात ब्रिटिश सरकारच्या व सावकारांच्या शेतकरी विरोधी धोरणामुळे महाराष्ट्रात शेतकरी व अदिवासींनी मोठ्या प्रमाणात उठाव केले, पण सरकारने ते मोठ्या निर्दयीपणे चिरडून टाकले. हळूहळू शिक्षणाच्या प्रसारामुळे महाराष्ट्रात नवसुशिक्षित वर्ग जागृत होऊन शेतकरी प्रश्नात लक्ष देऊ लागला. त्यामध्ये न्या. रानडेंची 'सार्वजनिक सभा' व म.फुले यांचे 'सत्यशोधक समाज' यांनी पुढाकार घेतला व शेतकऱ्यांत त्यांच्या शोषणाबाबत जाणीव—जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू केला.

संदर्भ :—

१) डॉ. चौसाळकर अशोक, महात्मा फुले आणि शेतकरी चळवळ, लोकवाङ्मय गृह, मुंबई

२) फडके य. दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र, के सागर, पुणे

३) दामजी बी. एच, अर्थिक विचारांचा इतिहास, विद्या बुक्स